# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २००९ वर्ष १ अंक ३ पृष्ठे ८ रु. २/-

जेव्हा एखादा माणूस जगभर भ्रमण करतो तेव्हा लक्षात येते की, माणूस इथून तिथून सगळीकडून एका विलक्षण पातळीपर्यंत स्वभावधर्मात सारखाच आहे, मग तो अमेरिकेतील, भारतातील किंवा ऑस्ट्रेलियातील असो. विशेषत: कॉलेजांमधून व विद्यापीठातून हे अगदी खरे आहे. सुरक्षितता मिळवण्यामध्ये, कोणीतरी होण्यामध्ये, कमीत कमी बुद्धी वापरून मौजमजा करण्यामध्ये ज्यांना रस आहे अशा तऱ्हेची माणसे जणू आपण विद्यापीठांच्या साच्यातून काढत आहोत.

आपल्या पारंपरिक शिक्षणाने, स्वतंत्र बुद्धी ही गोष्ट खूप कठीण करून ठेवली आहे. कशाशीतरी जमवून घेण्याने सामान्यत्व येते. समाजापासून वेगळे होणे, परिस्थितीच्या विरुद्ध जाणे हे सोपे नाही. विशेषत: जोपर्यंत तुम्ही यशाचा पाठलाग करता तोपर्यंत ते बऱ्याच वेळा धोक्याचे ठरते. ऐहिक किंवा आध्यात्मिक इनामांचा पाठपुरावा करणे, म्हणजे यशाची तीव्र इच्छा बाळगणे; आंतरिक व बाह्य सुरक्षितता शोधणे, सुखसोयीची आस बाळगणे ह्या सर्व प्रक्रिया तुमच्यामधील तळमळ नाहीशी करतात, उत्स्फूर्ततेचा शेवट होतो आणि भीती निर्माण होते; आणि भीती जीवनाचे सूज्ञ आकलन थांबवते. वाढत्या वयामुळे मन आणि हृदय हे मंद व्हायला लागतात.

सुखसोयीच्या मागे लागल्याने आपल्याला एक शांत कोनाडा सापडतो, ज्यामध्ये संघर्ष नसतो आणि मग त्या कोनाड्याबाहेर पाऊल टाकायला आपण घाबरतो. ही जगण्यासंबंधी भीती, धडपडीची भीती, नव्या अनुभवाची भीती, आपल्यातील साहसाची धडक नाहीशी करते; आपले संपूर्ण पालनपोषण आणि शिक्षण ह्यांनी जवळपासच्या लोकांपेक्षा वेगळे असण्याची भीती, समाजाच्या प्रस्थापित घडीच्या विरुद्ध जाण्याची भीती आपल्यामध्ये निर्माण केली आहे आणि अधिकार व परंपरा ह्यांना खोटा मान द्यायला शिकविले आहे.

सुदैवाने काहीजण आहेत जे उजव्या-डाव्याचा पूर्वग्रह न बाळगत गंभीरपणे माणसाच्या समस्या तपासायला तयार आहेत. परंतु आपल्यामधील बहुतांशी लोकांमध्ये असंतोषाची खरी भावना नसते, बंडखोरी नसते, जेव्हा आपण पूर्णपणे सत्य समजून न घेता परिस्थितीपुढे नमते घेतो तेव्हा आपल्यातील बंड करण्याची वृत्ती नाहीशी होते आणि आपल्या जबाबदाऱ्या लवकरच तिचा शेवट करतात.

दोन प्रकारची बंडे असतात. एक हिंसक लढा ज्यामध्ये सद्य दु:स्थिती न जाणता फक्त प्रतिक्रिया असते; आणि दुसरा प्रज्ञेचा सखोल मानसिक लढा असतो. असे अनेक आहेत जे प्रस्थापित सनातन मताविरुद्ध बंड उभारतात; परंतु ते नव्या श्रद्धा, नव्हे भ्रम आणि स्वत:च्या लपलेल्या उपभोगाच्या इच्छा यांना कवटाळतात. सर्वसाधारणपणे असे घडते की आपण एक समाज, एक मंडळ किंवा आदर्शाचा संच सोडतो व दुसऱ्यांना सामिल होतो, दुसरे आदर्श स्वीकारतो. अशा प्रकारे नवनिर्मित विचारधारेला सामोरे जावे लागते. प्रतिक्रिया नवे विरोध निर्माण करते आणि सुधारणांना पुढची सुधारणा हवीच.

परंतु एक शहाणपणाचे बंड असते जी प्रतिक्रिया नसते, ते स्वज्ञानातून, स्वत:चे विचार व भावनांच्या अवधानातून उद्भवते. जेव्हा आपण, अनुभव येतात तसतसे त्यांना सामोरे जातो, अडचणी टाळत नाही तेव्हाच आपण उच्च प्रज्ञा जागृत ठेवतो आणि प्रज्ञा उत्तुंगतेने जागृत होते तेव्हा अंत:प्रेरणा असते; जीवनात तीच खरी मार्गदर्शक आहे.

आता आयुष्याचा अर्थ काय ? आपण कशासाठी जगतो आहोत, झगडतो आहोत ? जर का आपल्याला गौरवासाठी, व्यवसायासाठी, अधिक प्राविण्यासाठी, दुसऱ्यावर मात करण्यासाठी शिकवले जात असेल तर आपले आयुष्य उथळ व पोकळ असेल. जर आपल्याला वैज्ञानिक होण्यासाठी - पुस्तकातील कीडा बनलेला विद्वत्ताप्रचुर विद्यार्थी बनण्यासाठी, किंवा ज्ञानाची चटक लागलेला विशेषज्ञ बनण्यासाठी शिक्षण दिले गेले तर आपण जगामध्ये सर्व नाश व दु:खाला आमंत्रण देऊ.

आयुष्याला उच्च व विशाल संदर्भ असेल; पण आपण जर तो शोधला नाही तर शिक्षणाला काय किंमत ? आपण उच्चशिक्षित असू, परंतु विचार व भावनांची एकात्मकता नसेल तर आपले जीवन अपूर्ण, परस्परविरोधाने व भीतीने पछाडलेले असेल. शिक्षण जर जीवनाच्या दृष्टिकोनात एकात्मता जोपासू शकत नसेल तर त्या शिक्षणाला फार थोडा अर्थ आहे. आपल्या सध्याच्या संस्कृतीत आपण जीवन अनेक भागांत विभागलेले आहे. त्यामुळे एक विशिष्ट तंत्र किंवा व्यवसाय शिकण्यापलीकडे शिक्षणाला फारसा अर्थ नाही. व्यक्तीची साकल्यपूर्ण प्रज्ञा जागृत करण्याऐवजी शिक्षण त्याला साचेबद्ध होण्यास प्रोत्साहन देते. त्यामुळे आपण स्वत: एक संपूर्ण प्रक्रिया आहोत हे ओळखण्यात अडथळा करते. जीवनातील अनेक समस्या त्या त्या स्तरावर सोडवण्याचा प्रयत्न म्हणजे त्या समस्या वेगवेगळ्या वर्गवारीत विभागणे, हा आकलनाचा संपूर्ण अभाव आहे.

व्यक्ती ही अनेक घटकांची बनली आहे, परंतु फरकांवर भर देऊन एका विशिष्ट घटकाच्या प्रगतीला महत्त्व देणे म्हणजे गुंतागुंत व परस्परविरोध निर्माण करणे होय. शिक्षणाने त्या वेगवेगळ्या घटकांची एकात्मता साधली पाहिजे. कारण साकल्यभावाशिवाय जीवन हे संघर्ष व दु:खाची मालिका होते. जर वकील तंटेबखेडे वाढवण्याला मदत करणार असेल तर वकिलीच्या शिक्षणाला काय मूल्य ? शिकून जर आपण गोंधळातच राहणार असू तर शिक्षणाला काय किंमत ? तंत्रज्ञानाचा व व्यवसायक्षमतेचा उपयोग जर एकमेकाला नष्ट करण्यात होणार असेल तर त्याला काय अर्थ आहे ? अस्तित्वाचा हेतू काय जर ते फक्त हिंसा व दु:खाकडे नेणार असेल ? आपल्याकडे पैसा असेल किंवा तो कमवायची क्षमता असेल, सुखे आपल्या पायाशी असतील, आणि आपल्याजवळ प्रस्थापित धर्म देखील असतील तरी आपण संपणाऱ्या संघर्षात आहोत.

आपण व्यक्तिगत (Personal) आणि व्यक्ती (Individual) ह्यांतला फरक समजायला हवा. व्यक्तिगत हे योगायोगाने आलेले म्हणजे जन्मामुळे प्राप्त झालेले म्हणजे, ज्या वातावरणात आपण वाढलो, आपले राष्ट्रीयत्व, श्रद्धा, वर्गभेद, पूर्वग्रह वगैरे जे व्यक्तिगत व योगायोगाने येणारे परंतु क्षणिक असते. जरी तो क्षण कदाचित आयुष्यभरही टिकेल. आजची शिक्षणपद्धत व्यक्तिगत तत्त्वावर व योगायोगाने येणाऱ्या क्षणिक गोष्टींवर आधारलेली असल्यामुळे ती विचारांना विकृत बनवते व स्वसंरक्षणाच्या भीतीचे पोषण करते.

शिक्षण आणि वातावरण, आपल्या सर्वांना व्यक्तिगत फायदा, स्वसंरक्षण, स्वत:साठी धडपड ह्यांचे प्रशिक्षण देते. गोंडस शब्दांचे आवरण घातले तरी आपल्याला पद्धतबद्ध व्यवसायासाठी शिक्षण दिले जाते, जे शोषण आणि संचिताच्या रक्षणाच्या भीतीवर आधारित असते, अशा शिक्षणाने आपल्यामध्ये आणि जगामध्ये गोंधळ व दु:ख निर्माण होणे अटळ आहे, कारण ते प्रत्येक माणसामध्ये असे मानसिक बांध तयार करते, जे त्याला वेगळा पाडतात आणि इतरांपासून दूर नेतात.

शिक्षण ही फक्त मनाला प्रशिक्षित करण्याची गोष्ट नाही. प्रशिक्षण प्रावीण्य आणते पण पूर्णत्व नाही. जे मन फक्त प्रशिक्षित असते ते भूतकाळ चालू ठेवते. ह्या प्रकारचे मन नव्याचा शोध घेऊ शकणार नाही. म्हणून खरे शिक्षण काय आहे हे शोधण्यासाठी आपल्याला जगण्याचा संपूर्ण अर्थ शोधून काढला पाहिजे.

आपल्यापैकी बऱ्याच जणांना संपूर्ण जीवनाच्या अर्थाचे प्राथमिक महत्त्व नाही, आणि आपले शिक्षण दुय्यम मूल्यांना महत्त्व देते, ज्याच्यामुळे ज्ञानाच्या काही शाखांमध्ये आपण तरबेज होतो. ज्ञान व प्रावीण्य जरी आवश्यक असले तरी त्यांच्यावर मुख्य भर देणे म्हणजे संघर्ष व गोंधळाला वाट देण्यासारखे आहे.

प्रेमामुळे उत्स्फूर्त झालेले एक प्रावीण्य असते जे पार पलीकडे जाते आणि ते महत्त्वाकांक्षेच्या प्राविण्याहून फार महान आहे. प्रेम - ज्याच्यामुळे जीवनाचे साकल्याने आकलन होते - त्याच्याशिवायचे शिक्षण निर्दयतेला जन्म देते. जगभर हेच प्रत्यक्ष घडत नाही का ? आपले आजचे शिक्षण उद्योग व युद्धे यांकडे खेचणारे आहे, त्यामुळे त्याचे लक्ष्य नैपुण्याची वाढ आहे; आणि आपण निर्दय स्पर्धा व आपसातील नाश यांच्या यंत्रणेत पकडले गेलो आहोत. शिक्षण युद्धाच्या दिशेने नेत असेल, त्याने नाश करा किंवा नष्ट व्हा असे शिकवले तर ते शिक्षण संपूर्णत: अपेशी नाही का ?

खरे शिक्षण द्यायचे असेल तर जीवनाचा समग्र अर्थ समजला पाहिजे हे उघडच आहे; आणि त्यासाठी आपल्याला विचार करता आला पाहिजे, सतत विचार नव्हे तर प्रत्यक्ष व खरोखर.केवळ बौद्धिक सुसंगती राखणारा मनुष्य हा खरे तर विचारशून्य असतो. कारण तो पद्धतीशी जुळवून घेतो, शब्दप्रयोगाची पुनरुक्ती करते, आणि साचेबद्ध विचार करते. आपण अस्तित्व कल्पनेतून किंवा सिद्धान्तातून समजू शकणार नाही. जीवनाचे आकलन म्हणजे स्वत:चे आकलन होणे, आणि ती शिक्षणाची सुरुवात व परिणती आहे.

शिक्षण म्हणजे फक्त ज्ञान मिळवणे नव्हे. माहिती गोळा करणे व संदर्भ दाखवणे नव्हे; तर शिक्षण म्हणजे संपूर्ण अशा जीवनाचा अर्थ शोधणे. परंतु संपूर्ण हे त्याच्या अंशातून सापडू शकत नाही, सरकार, धार्मिक संस्था, अधिकारवादी पक्ष मात्र तशा प्रकारे प्रयत्न करीत आहेत.

शिक्षणाच्या प्रक्रियेत जर आपण स्वनाश करणार असू तर शिकण्यामध्ये चांगले काय राहिले ? विध्वंस करणाऱ्या युद्धांची मालिका - अगदी एकामागून एक युद्धे येतात तेव्हा ज्या पद्धतीने आपण आपली मुले वाढवतो आहोत त्यात आपले काही मूलभूत चुकतेय हे स्पष्ट आहे. मला वाटते, आपल्यापैकी बऱ्याचजणांना त्याची जाणीव आहे. परंतु त्याला तोंड कसे द्यायचे ते माहीत नाही.

*एज्युकेशन अँड द सिग्निफिकन्स ऑफ लाईफ* प्र. १

---

# कृष्णमूर्ती फाउंडेशन वार्षिक संमेलन २००८

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाने आयोजित केलेले वार्षिक संमेलन या वर्षी कृष्णमूर्ती अध्ययनकेंद्र सह्याद्री येथे नोव्हेंबर १८ ते २२ या काळात भरले होते. संमेलनाला भारतातील विविध राज्यामधून व काही इतर देशांतून मिळून एकूण २२५ अभ्यासक आले होते. या संमेलनाचे वैशिष्ट्य असे असते की, जसे जुने मित्र - कृष्णजींचे आज अनेक वर्षे जे अभ्यासक आहेत ते - समविचारी मित्रांबरोबर भेटण्यासाठी जमतात, तसेच काही नव्याने कृष्णमूर्तींचा अभ्यास करू इच्छिणारे तरुण मित्र काहीतरी नवीन मार्गदर्शन मिळू शकेल या उमेदीने आलेले असतात.

या संमेलनाचा विषय होता *मनुष्य आणि निसर्ग यांचे नाते.* १९ नोव्हेंबरला सकाळी श्री. किशोर खैरनार यांनी सर्वांचे स्वागत करून आणि संमेलनाची रूपरेषा विशद करून संमेलनाची सुरुवात केली. प्रथम कृष्णमूर्तींची संबंधित विषयावरची चित्रफीत दाखविण्यात आली.

त्यानंतर प्रा. पी. कृष्णा यांचे भाषण झाले. त्यांनी निसर्गामध्ये असलेली परिपूर्ण व्यवस्था (Complete order) माणसांच्या जाणिवेमधून का हरवली आहे याचा वैज्ञानिक दृष्टीने मागोवा घेतला. त्यांच्या भाषणानंतर निसर्गाशी माणसांचा संबंध का दुरावला आहे याचा शोध घेणारी आणि विचारांना चालना देणारी प्रश्नोत्तरे झाली.

दुसऱ्या दिवशी फाउंडेशनचे सेक्रेटरी श्री. एस्. पी. कंदास्वामी यांनी मानवी समस्यांचे मूळ निसर्गाशी तुटलेल्या संबंधामध्ये कसे दडलेले आहे हे सविस्तरपणे विशद करीत आपल्या भाषणातून मनुष्य निसर्गाचाच एक भाग कसा आहे याचे प्रतिपादन केले. निसर्गाची विशालता (Immensity) निसर्गातील गहनता (Gravity) आणि निसर्गातील पावित्र्य-शुचिता (sanity) ही त्रिसूत्री माणसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग झाली पाहिजे. आजच्या अनेक समस्यांचे कारण माणसाने आपल्या स्वार्थासाठी, निसर्गावर मात करण्याच्या ईर्षेने, निसर्गाशी केलेल्या दुराव्यामध्येच सामावलेले आहे. या भाषणानंतर श्रोत्यांशी झालेली प्रश्नोत्तरे सर्वांना अंतर्मुख करणारी होती. संध्याकाळी कृष्णजींच्या भाषणाची या विषयाशी सुसंगत चित्रफीत दाखविण्यात आली.

तिसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबरला *निसर्गाशी पुन्हा नाते जोडण्यासाठी काय करता येईल* यावर एक परिसंवाद झाला. परिसंवादामध्ये डॉ. ए. गजानन राव, प्रो. कृष्णनाथ श्री. पी. रमेश व श्री. किशोर खैरनार सहभागी झाले होते. परिसंवादानंतर कृष्णजींच्या भाषणाची चित्रफीत दाखविली.

दि. १९ व २० नोव्हेंबर या दोन दिवसांत गटचर्चा झाल्या. प्रत्येकाला आपला प्रतिसाद देता यावा या हेतूने या गटचर्चा ठेवल्या जातात व त्यामुळे अभ्यासकांना विषय समजून घ्यायला खूप मदत होते असे दिसून येते.

शेवटच्या दिवशी दि. २१ रोजी संध्याकाळी ६.३० वा. श्रीमती आरती अंकलीकर यांच्या सुश्राव्य शास्त्रोक्त गायनाने सर्व श्रोते तृप्त झाले. विशेषत: त्यांच्या 'बोलावा विठ्ठल - करावा विठ्ठल' या अभंगगायनाने श्रोते भक्तिरसाच्या अनुभूतीने नि:शब्द झाले आणि तीन दिवस चाललेल्या संमेलनाची गोड सांगता झाली.

# संपादकीय

शिकणे आणि शिक्षण त्या अगदी दोन वेगवेगळ्या गोष्टी झाल्या आहेत. शिकणे हा अनंत प्रवाह आह, तर शिक्षण हा अनेक हेतू व मूल्यांचा त्यावरील बोध आहे. उगवणाऱ्या सूर्याची अनंत किरणे अंतरिक्षात फैलावतात तेव्हा त्यांना सीमा नसते, आखणे नसते; शिकणे हे तसे अमर्याद असते. ते चारही दिशांनी वाढते आणि चारही दिशांकडून आत्मसात करते.

शिकणे हे जेव्हा आकारले जाते, आखले जाते, अभ्यासक्रमांच्या मर्यादेत बसवले जाते, अवकाशातून अंतरिक्षातून शाळा, कॉलेज, विद्यापीठात आणून बसवले जाते तेव्हा ते शिक्षण होते. पुराणातील दत्तात्रयाच्या निसर्गातील अनेक गुरुंची जागा, विषयातील तज्ञ मानवाने घेतली. विशिष्ट विषयातील तज्ञ कितीही हुशार असला तरी तो नकळत जग त्याच्या नजरेतून, त्याच्या मर्यादित ज्ञानातून पाहण्याची शक्यता असते, त्याला अनुसरून निष्कर्ष असतात. ते अधुरे असण्याचा धोका असतो. शिकण्याचे विद्यापीठ विश्व आहे. शिक्षणाच्या शाळेला भिंती आहेत; मग त्या सामाजिक मूल्यांच्या असोत, आर्थिक सुरक्षिततेच्या असोत, देशाभिमानाच्या किंवा धार्मिक श्रद्धेच्या असोत.

मानवी जीवनातील शिकण्याचे महत्त्वाचे स्थान ढळण्याचे आणखी एक कारण म्हणजे शिकणे हे चरितार्थासाठी आहे हा समाजातील दृढ समज. चरितार्थाला प्रथम स्थान दिले जाते. जीवनासाठी चरितार्थ नाही तर चरितार्थासाठी जीवन झालंय. चरितार्थासाठी जीवन वाहणे म्हणजे साधनासाठी साध्य हरवण्यासारखे आहे. शिकण्याला स्वत:चा गोडवा, स्वत:चा अर्थ, स्वत:चा आनंद आहे. चरितार्थासाठी त्याचा उपयोग होतो हे दुय्यम आहे.

प्रत्येक गोष्टीला तिचे स्थान असते. ते स्थान ओळखण्यासाठी शाळेच्या भिंतीतील शिक्षण अपुरे आहे. म्हणून शिक्षणाची ही भयानक अवस्था झाली आहे. त्यात अपरंपार पैसा, लबाडी, भ्रष्टाचार, द्वेष, मत्सर हे प्रामुख्याने पोसले जातात.

मग ह्या शिक्षणात 'शिकणे' कसे टिकवायचे ? हा यक्ष प्रश्न आहे. सुरुवात करायचीच असेल तर आजच्या शिक्षणात माहिती गोळा करणे हे ध्येय आहे, 'शिकणे' नव्हे हे ओळखले पाहिजे. आजच्या शिक्षणातील त्रुटी प्रत्यक्ष पहायला हवी तरच तिच्यावर उपाय करण्याचा प्रश्न येईल. हे मान्य नसेल तर 'हा समाज असाच असणार आणि त्यात जुळवून घेणे भाग आहे' असे विचार असतील, मग बोलणेच बंद.

पण समाजाची अवस्था गंभीरपणे ओळखून त्यात आमूलाग्र बदल आणायचा असेल तर शिक्षणाकडे बघण्याचा प्रचलीत दृष्टिकोण बदलला पाहिजे.

शिक्षणातून काही तरी साध्य करायची आस, महत्त्वाकांक्षा ह्यासारख्या गोष्टी जीवनात नकारार्थी भावनांचे पोषण करतात. त्या शिक्षणातून कशा घालवता येतील, स्पर्धा, तुलना ह्याशिवाय उत्तम शिक्षण कसे देता येईल, मुलांचे बालपण, निरागसता कशी सावरता येईल ह्याकडे शिक्षणाचे लक्ष हवे. पालक मुलांवर खरोखर प्रेम करीत असतील, शिक्षकांच्या मनात मुलांबद्दल कळकळ असेल तर त्यांना कळेल की शिक्षण हे सुंदर जीवनासाठी आहे. सुंदर जीवनात प्रेमाला अग्रस्थान आहे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, *''फक्त प्रेम व योग्य विचारसरणी खरी क्रांती, स्वत:मध्ये आमुलाग्र बदल आणू शकेल''*

कृष्णमूर्तींनी विद्यार्थी, शिक्षक व पालक ह्यांच्याशी वेळोवेळी शिक्षणावर सुंदर संवाद केले आहेत. स्पष्ट व सोप्या शब्दात शिक्षणाचे प्रमुख कार्य संपूर्ण जीवनाशी निगडीत आहे हे समजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी जगभर शाळा सुरू केल्या. त्यांचे शिक्षणासंबंधी झालेले संवाद, चर्चा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहेत. जीवनाविषयी खरी तळमळ असेल तर ते जरूर वाचावे व त्यातील सत्य पहावे.

---

जेव्हा गर्द सावलीत व खंडित किरणांचे ठिपके असलेल्या जंगलात तुम्ही फिरता, मग अचानक खुल्या मैदानात येता आणि समोर दिमाखदार वृक्षांनी घेरलेली हिरवी कुरणे पाहता, किंवा चमकदार झरे पाहता तेव्हा तुम्हाला प्रश्न पडतो. माणसाने या निसर्गाशी आणि पृथ्वीच्या सौंदर्याशी नाते का तोडले? ह्या गळणाऱ्या पानाशी, लोंबकळणाऱ्या फांदीशी संबंध का तोडला? तुमचा निसर्गाशी संपर्क तुटतो तेव्हा दुसऱ्याशी पण संबंध तुटणे अटळ आहे. निसर्ग म्हणजे नुसते फूल नव्हे, ती सुंदर हिरवळ नव्हे किंवा तुमच्या बागेत झुळझुळ वाहणारे पाणी नव्हे, परंतु निसर्ग म्हणजे तिच्यातील सर्व वस्तुसह ही अवघी पृथ्वी आहे. आपल्याला वाटते निसर्ग हा आपल्या वापरासाठी आहे, आपल्या सोईसाठी आहे, म्हणून आपण पृथ्वीबरोबरची सहजीवनाची भावना हरवतो. पडणाऱ्या पानाशी, शिखरावरील उंच झाडाशी असलेली भावनात्मकता, संवेदनशीलता ही परीक्षा पास होणे व व्यवसायी तल्लखता असणे ह्यापेक्षा खूप महान आहे. परीक्षा व व्यवसाय म्हणजे संपूर्ण जीवन नव्हे. जीवन हे पाण्याचा प्रचंड साठा असलेल्या नदीसारखे, आदी आणि अंताशिवाय आहे. प्रचंड प्रवाहातून आपण एक बादलीभर पाणी काढतो आणि ते बंदिस्त पाणी आपले जीवन होते. हे आपले संस्कार आहेत आणि न संपणारे दु:ख आहे.

म्हणून शिक्षक ह्या नात्याने आपण परिक्षणाच्या तेजस्वी प्रकाशात हे उघड करणार आहोत. परिक्षणाचा प्रकाश फक्त भ्रम नष्ट करतो असे नाही तर त्या प्रकाशात छोटे छोटे बारकावे स्पष्ट होतात. आम्ही म्हटल्याप्रमाणे, परिक्षण हे एका ठराविक दृष्टिकोनातून, श्रद्धेतून, पूर्वग्रहातून किंवा निष्कर्षातून नसते. मत ही अगदी क्षुल्लक गोष्ट आहे. तसाच अनुभव पण क्षुल्लक, अनुभवी माणूस हा धोकादायक असतो, कारण तो स्वत:च्या ज्ञानाच्या तावडीत सापडलेला असतो.

*द होल मुव्हमेंट ऑफ लाईफ इज लर्निंग*
*- जे. कृष्णमूर्तींची त्यांच्या शाळांना पत्रे* प्र.१४- सौंदर्य

# जे. कृष्णमूर्ती : व्यक्ती, संदेश आणि तुम्ही

**रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे ऑक्टोबर १८-१९, २००८ या दोन दिवसात जे. कृष्णमूर्ती यांचे जीवन-दर्शन व त्यांची शिकवण यावर झालेले कार्यक्रम.**

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, चेन्नई, यांनी त्यांच्या मुंबई केंद्राच्या सहकार्याने रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे ऑक्टोबर १८-१९, २००८ या दोन दिवसांत जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण अधिकाधिक लोकांपर्यंत पोचविण्यासाठी काही लक्षणीय कार्यक्रम सादर केले आणि या सर्व कार्यक्रमांना मुंबईकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याचा हा सविस्तर वृत्तांत.

ज्या मुंबईत कृष्णमूर्तींनी १९४८ पासून जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌च्या प्रांगणात जवळ जवळ ४० वर्षे आपल्या भाषणांनी मुंबईकरांना मंत्रमुग्ध केले होते. त्याच मुंबईत वीस वर्षांनी म्हणजेच कृष्णजींचे फेब्रु. ८६ मध्ये निधन झाल्यानंतर एका पिढीच्या अंतराने दोन दिवसांचे कार्यक्रम सादर करून कृष्णजींचे जगावेगळे जीवन व त्यांची शिकवण लोकांपुढे ठेवली गेली, आजच्या अस्वस्थ आणि असुरक्षित समाजाला त्यातून कदाचित आशेचा किरण सापडू शकेल या भावनेने.




या कार्यक्रमाचे उद्‌घाटन १८ ऑक्टोबर २००८ सकाळी १० वा., रवींद्र नाट्यमंदिर संकुलातील पु. ल. देशपांडे सभागृहाबाहेर बॉम्बे केंब्रिज स्कूलचे अध्यक्ष श्री. विक्रम पटेल यांच्या हस्ते झाले. मुंबई केंद्राचे सेक्रेटरी श्री. आर. आर. चारी यांनी उपस्थितांचे स्वागत करून ज्या मित्रांनी कृष्णमूर्तींवरील प्रेमापोटी हे कार्यक्रम उभे करण्यासाठी सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे ब्रीदवाक्य होते :

**जे. कृष्णमूर्ती : व्यक्ती, संदेश आणि तुम्ही**

पु. ल. देशपांडे सभागृहातील कला दालनामध्ये कृष्णमूर्तींच्या अगदी बालपणापासूनच्या निरागस फोटोपासून ते त्यांच्या ९० वर्षांच्या जीवन यात्रेतील अगदी दुर्मिळ छायाचित्रांचे एक मनोवेधक विश्व निर्माण केले होते. कृष्णजींच्या शिकवणीतील काही निवडक आणि समर्पक वचने या छायाचित्रासोबत त्यांच्या शिकवणीची साक्ष देत उभी होती. छायाचित्रांची मांडणी तसेच प्रकाशयोजनेमुळे या प्रदर्शनाला एक आगळे परिमाण लाभले होते.

या सर्व सुंदर छायाचित्रांची तसेच सोबत दिलेल्या त्यांच्या वचनांची एक छोटीशी आकर्षक पुस्तिका फाउंडेशनने प्रकाशित केली आहे. ती पुस्तिका २५ रु. किंमतीला मुंबई केंद्राकडे तसेच सह्याद्री अध्ययन केंद्राकडे उपलब्ध आहे.

सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर युनिटी सभागृहामध्ये कृष्णजींच्या सर्व इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी पुस्तकांचे तसेच डीव्हीडीज्‌चे प्रदर्शन व विक्री आयोजित केली होती. या पुस्तक प्रदर्शनाच्या एका बाजूला कृष्णजींच्या भाषणातील निवडक उताऱ्यांची विषयवार चित्रफित पाहण्यासाठी १२ संगणकांची व्यवस्था केली होती. तरुण अभ्यासकांनी या संधीचा फायदा घेतला असे दिसून आले. अनेक अभ्यासकांनी या प्रदर्शनाला भेट दिली व बरीच पुस्तके आणि डिव्हीडीज् खरेदी केल्या.

तिसऱ्या मजल्यावर दोन सभागृहांमध्ये सकाळी ११।। वा. *आजच्या शिक्षणामध्ये कोणती समस्या आहे ?* या विषयावर मराठी आणि इंग्रजी भाषेमधून परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. मराठी परिसंवादामध्ये डॉ. सतीश इनामदार, श्री. किशोर खैरनार व डॉ. वासंती पडते यांनी भाग घेतला होता. बरेंच अभ्यासक या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते. तसेच इंग्रजीमधून झालेल्या परिसंवादामध्ये कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या शाळांमधून आलेल्या डॉ. शैलेश शिराळी, श्री. अलोक माथूर व श्रीमती जयश्री नंबियार आणि सेंट झेवियर्स कॉलेजचे प्रा. डॉ. लॅन्सी प्रभू व रहेजा कॉलेजचे प्रा. डॉ. अभिजित पडते यांनी भाग घेतला होता.

या सर्व वक्त्यांनी आजच्या मानवी जाणीवांमध्ये आध्यात्मिक, भावनिक व प्रत्यक्ष जीवनामध्ये कोणत्या समस्या भेडसावीत आहेत त्याचा वेध घेत त्या समस्यांची उकल करण्यास आजचे शिक्षण समर्थ आहे का याचा उहापोह केला.

श्रोत्यांमध्ये शास्त्रज्ञ, कलाकार, शिक्षक आदि मंडळी सहभागी झाली होती. फाउंडेशनच्या शाळांमधून पास झालेले विद्यार्थी शाळेतून बाहेर पडल्यावर या स्पर्धात्मक जगास कसे सामोरे जातात हे समजून घेण्यामध्ये बऱ्याच श्रोत्यांना रस होता. कदाचित श्रोत्यांमधील काही जणांना या शाळांमधून शिकून बाहेर आलेली मुले भविष्यकाळातील आव्हानांना अधिक समर्थपणे तोंड देऊ शकतील अशी आशा वाटत होती.

१८ ऑक्टोबरलाच दुपारी २।। वा. तिसऱ्या मजल्यावरील ऑडिटोरिअममध्ये *परिवर्तनाचे आव्हान* ही कृष्णजींच्या जीवनयात्रेवर आधारीत मराठी चित्रफीत दाखविली गेली. कार्यक्रमाला अनेक अभ्यासकांनी प्रतिसाद दिला. त्यानंतर तेथेच इंग्रजीमधून *The Seer who walks Alone* ही कृष्णजींचे जीवनदर्शन देणारी श्री. अरविंदन् या एका समर्थ कला दिग्दर्शकाने निर्माण केलेली एक सुंदर चित्रफीत दाखविली गेली. दोन्ही कार्यक्रमांना अनेक अभ्यासकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रविवार दि. १९ रोजी रवींद्र नाट्यमंदिर येथील मुख्य सभागृहामध्ये सकाळी १० वा. फाउंडेशनचे सचिव श्री. एस्. पी. कंदास्वामी यांच्या बीज भाषणाने सुरुवात झाली. श्री. कंदास्वामी यांनी या दोन दिवसांच्या कार्यक्रमांचा उद्देश, फाउंडेशन करीत असलेले कार्य याचा थोडक्यात परिचय करून दिला व या कार्यक्रमातील मुख्य वक्ते प्रसिद्ध पत्रकार व साहित्यिक

श्री. रणजित होस्कोटे व इन्फोसिस्‌चे अध्यक्ष श्री. नंदन निलेकानी यांचे स्वागत केले. डॉ. शैलेश शिराळी यांनी या दोन वक्त्यांचा परिचय करून दिला व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

त्यानंतर श्री. होस्कोटे यांचे भाषण झाले. त्यांच्या भाषणाचा विषय होता *कृष्णजींच्या शिकवणीची आजच्या काळातील समर्पकता.* यांनी कृष्णजींच्या गूढ जीवनयात्रेचा वेध घेत कृष्णमूर्तींची शिकवण आजच्या काळाला कशी मार्गदर्शक होऊ शकेल याचे खोलवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. आत्यंतिक स्वभान आणि संपूर्ण मुक्तीच मानवी मनामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणू शकते आणि हे प्रत्यक्ष जीवनात उतरविण्यामध्ये त्यांच्या शिकवणीची खरी कसोटी आहे याचे विवेचन केले.

या भाषणानंतर या सर्व कार्यक्रमामधील एक महत्त्वाचा भाग म्हणजे ब्रेल लिपीमध्ये कृष्णमूर्तींच्या काही निवडक पुस्तकांचे *नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड* या संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर श्री. रमण शंकर यांच्या हस्ते झालेले प्रकाशन. त्याचवेळी कृष्णमूर्तींच्या दोन चरित्रांचे - मराठीतील 'जे. कृष्णमूर्ती : जीवन आणि मृत्यू' आणि श्रीमती पुपुल जयकर यांचे इंग्रजीतील 'कृष्णमूर्तींचे चरित्र' या पुस्तकांच्या ऑडिओ संस्करणाचे देखील प्रकाशन झाले आणि जे वाचू शकत नाहीत त्या सुहृदांना कृष्णजींच्या 'जीवन-भाष्याचे' दरवाजे खुले झाले. यावेळी श्री. रमण शंकर यांनी या उपक्रमांचे स्वागत करून आपली हृद्य भावना प्रकट केली.

या कार्यक्रमानंतर इन्फोसिस्‌चे अध्यक्ष श्री. नंदन निलेकानी यांचे *सामाजिक जबाबदारी* या विषयावर भाषण झाले. एखाद्या कंपनीची सुरुवात करताना व ती यशस्वी करताना सहकार्याची कशी कसोटी लागते व त्यासाठी सामाजिक जबाबदारीची जाणीव कशी ठेवावी लागते हे त्यांच्या स्वत:च्या कंपनीच्या उदाहरणाने त्यांनी विषद केले.

त्यानंतर What is the Future of Humanity ? *(मानवतेचे भवितव्य काय?)* ही कृष्णमूर्तींच्या भाषणाची चित्रफीत दाखविली गेली या दोन दिवसांच्या कार्यक्रमांची सांगता झाली.

पुस्तक प्रदर्शन व फोटो प्रदर्शन संध्याकाळी ७ वाजेपर्यंत अभ्यासकांसाठी खुले होते.



## शिकणे केव्हा शक्य आहे ?

शोध घेणे आणि शिकणे हे मनाचे कार्य आहे. शिकणे म्हणजे मला असं म्हणायचं नाही की स्मृतीची केवळ मशागत करणे किंवा ज्ञान गोळा करणे. तर स्पष्टपणे, समजूतदारपणे आणि भ्रमाशिवाय विचार करण्याची क्षमता असली पाहिजे. वस्तुनिष्टपणे सुरुवात पाहिजे, आदर्शांमधून नव्हे. जर विचारांचा उगम निर्णयामधून असेल तर ते शिकणे नव्हे. केवळ माहिती आणि ज्ञान गोळा करणे म्हणजे शिकणे नव्हे. शिकण्याचा मतितार्थ आहे बोधाबद्दल (आकलनासाठीच) प्रेम, एखादी गोष्ट करण्यासाठीच केवळ प्रेम असणे. शिकणे त्याच वेळी शक्य असते जेव्हा तुम्हाला इतर कुठल्याही प्रकारची जबरदस्ती नसते आणि जबरदस्ती अनेक रूपे धारण करते, नाही का ? वशिल्यामधून जबरदस्ती येते, आसक्तीमधून, धमकीमधून येते, उत्तेजनार्थ मन वळविण्यामधून किंवा अगदी सूक्ष्म आमीषामधून सुद्धा जबरदस्ती होते.

बहुतेक लोकांना वाटते की, तुलनेद्वारे शिकण्याला उत्तेजन मिळते. परंतु वस्तुस्थिती त्या विरुद्ध आहे. तुलना वैफल्य निर्माण करते आणि केवळ द्वेषाला उत्तेजन देते आणि यालाच स्पर्धा म्हणतात. मन वळविण्याच्या इतर काही पद्धतीप्रमाणे तुलना ही शिकण्याला प्रतिबंध करते आणि भीतीला जन्म देते.

*द बुक ऑफ लाइफ,* ११ जानेवारी

### कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI) येथील विशेष अध्ययन कार्यशाळा

| | |
|---|---|
| १२ ते १६ जानेवारी २००९ | To live with Death requires A Great Deal of Enquiry |
| ९ ते १३ फेब्रुवारी २००९ | Life becomes a Problem because I meet Life as a Problem |
| १ ते ७ मार्च २००९ | There is a Total Change when The Observer is the Observed |

**संपर्कासाठी पत्ता :** संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री, पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २८४३४६ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

### आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर येथील विशेष अध्ययन कार्यशाळा

१० ते ११जानेवारी २००९ Be Your Own Teacher. १५ फेब्रुवारी २००९ वार्षिक दिन

**संपर्कासाठी पत्ता :** संपर्कासाठी पत्ता :- आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र. दूरध्वनी : ९८२२३४७४५४, (०२२) २५१५३०९४, २४२२३१९९ • ई मेल : zilog@vsnl.com

# परिक्षण

## जे. कृष्णमूर्ती: जीवन आणि मृत्यू

### लेखक : मेरी लट्येन्स्, अनुवाद : कल्याणी किशोर

जे. कृष्णमूर्ती यांच्या जीवनावर मेरी लट्येन्स् या ब्रिटिश लेखिकेने आतापर्यंत चार पुस्तके लिहिली आहेत आणि या सर्व चरित्रग्रंथांमध्ये *जे. कृष्णमूर्ती: जीवन आणि मृत्यू (The Life and Death of J. Krishnamurti)* हे १९९० साली कृष्णजींच्या मृत्यूनंतर चार वर्षांनी इंग्रजीत प्रकाशित झालेले आणि कृष्णमूर्तींच्या समग्र जीवनाचा परामर्श घेणारे फार महत्त्वाचे चरित्र आहे. मेरी लट्येन्स्  या कृष्णजींना त्यांच्या लहानपणापासूनच ओळखत होत्या व त्यांच्या सहवासात राहिल्या होत्या म्हणून त्यांना कृष्णजींचे जीवन अगदी जवळून निरीक्षण करण्याची संधी मिळाली होती. या संधीचा कृष्णजींची चरित्रे लिहिताना त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला असे दिसून येते.

तर अशा या महत्त्वाच्या चरित्रग्रंथाचा मराठी अनुवाद कृष्णजींच्या शिकवणुकीचा आज अनेक वर्षे अभ्यास करीत असलेल्या श्रीमती कल्याणी किशोर यांनी साध्या, सोप्या आणि ओघवत्या भाषेत केला आहे. या अनुवादित पुस्तकाचे पहिले प्रकाशन १९९५ साली झाले होते आणि आज १३ वर्षांनी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

कृष्णजींचे जीवन एका गूढ अनाकलनीय अशा अनेक घटनांनी आणि योगायोगांनी व्यापलेले आहे.

कृष्णमूर्तींची त्यांच्या वयाच्या १४ व्या वर्षी थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये त्यावेळी कार्यरत असलेल्या विशेष बिशप लेडबिटर यांनी अड्यार नदीच्या तीरावरून जगद्गुरूपदासाठी अनपेक्षितरित्या निवड केली. ॲनी बेझंट यांनी त्यांची संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारून त्यांच्यासाठी Order of the star या जागतिक संघटनेची स्थापना केली. कृष्णमूर्तींनी शेवटी ३ ऑगस्ट १९२९ रोजी जगद्गुरूपदाचा त्याग करून ॲनी बेझंटसह सर्वांना धक्का देऊन ही संघटना विसर्जित करून टाकली आणि याच ऐतिहासिक सभेत त्यांनी जाहीर केले की सत्य ही पथहीन भूमी आहे आणि कोणत्याही मार्गाने जाऊन तुम्हाला ते मिळणार नाही. कोणत्याही धर्मातून नाही, कोणत्याही संप्रदायातून नाही. त्यानंतर सतत ५७ वर्षे जगभर फिरून भाषणे व संवाद या माध्यमातून लोकांना भ्रमातून जागे करण्याचा त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केला.

कृष्णजींच्या शिकवणुकीचे सार सांगताना लेखिका म्हणते - ''ते आपले गुरू होणे नाकारतात. आपण काय करावे हेही ते आपल्याला सांगत नाहीत. ते फक्त आपल्यासमोर आरसा धरतात आणि आपल्यातील हिंसा, एकटेपणा, मत्सर व बाकीची इतर सर्व दु:खे - या सगळ्यांची कारणे ते आपल्या निदर्शनास आणून देतात - आपल्या समस्या फक्त आपणच सोडवू शकतो, दुसरे कुणीही नाही.''

कृष्णमूर्तींचे जीवन शब्दबद्ध करणे हे एक मोठे आव्हान होते. मूळ इंग्रजी लेखिका मेरी लट्येन्स यांनी ते समर्थपणे पेलले आहे आणि तेवढ्याच ताकदीने आपल्या सोप्या भाषेत प्रा. कल्याणी किशोर यांनी ते मराठीत अनुवादीत केले आहे. एवढे प्रभावी असे कृष्णजींचे चरित्र मराठीत आज उपलब्ध नाही. या आकर्षक पेपर बॅकमध्ये प्रकाशित केलेल्या २३४ पानी पुस्तकाची किंमत आहे रु. २५०/-. कृष्णजींचे अभ्यासक या पुस्तकाचे स्वागत करतील असा विश्वास आहे.




## कृष्णमूर्तींची शिक्षण विषयक काही पुस्तके आणि डिव्हिडीज् इ.

Education and the Significance  of Life
शिक्षण: जीवन रहस्य

Life Ahead
भावी जीवन

Krishnamurti on Education
शिक्षक - संवाद

Think on These Things
या गोष्टींचा विचार करा




A Timeless Spring : Krishnamurti at Rajghat
The Whole Movement of Life is Learning
Why are You being Educated?
What are You Doing with Your Life?
A Flame of Learning
Don't Make a Problem of Anything
Krishnamurti for the Young Series

**DVDs:**

**The brain is always recording:**
Talk to Rishi Valley School students

**Thinking about myself all day long:**
Talk to Rishi Valley School students
Rs 200 each

**MP3:**

**Education and the Challenges of Life:**
Six audio recordings of Krishnamurti's talks to school-children, college students, teachers, and parents. Rs 150



**The Journal of the Krishnamurti Schools :**
Consisting of articles by those involved in Krishnamurti education, the Journal is of relevance to parents and educators. Published every January. Rs 120

# पालक आणि शिक्षक

खऱ्या शिक्षणाचा आरंभ हा शिक्षकापासूनच होतो. म्हणूनच स्वत:च्या मनोविश्वाची घडण शिक्षकाला समजली पाहिजे; कुठल्याही वैचारिक साच्याची गुलामगिरी त्याने पत्करता कामा नये. कारण आपल्या व्यक्तित्वात जे आहे त्याच्याखेरीज दुसरे कुठलाही शिक्षक काय शिकवणार ? अशा तऱ्हेचे खरेखुरे शिक्षण जर शिक्षकालाच मिळाले नसेल, तर ज्या यांत्रिक पद्धतीच्या निर्जीव शिक्षणावर तो पोसला गेला तेच शिक्षण तो विद्यार्थ्यांवर लादणार आणि म्हणूनच शिक्षणशास्त्रातील खरी समस्या, शिकणारे मूल ही नसून शिकवणारे शिक्षक आणि पालक ही आहे. खऱ्या अर्थाने ज्याला शिक्षण म्हणता येईल ते आधी शिक्षकाला मिळाले पाहिजे.

शिक्षकाला स्वत: चे स्वरूप जर आकळलेले नसेल, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातल्या संबंधाचे पुरते ज्ञान जर त्याला नसेल तर इथून तिथून गोळा केलेल्या माहितीचे ओझे विद्यार्थ्यांच्या मनावर लादण्याखेरीज शिक्षक काय करू शकणार? अशा रीतीने नवे क्रांतिकारक शिक्षण आपण कसे अस्तित्वात आणणार ? विद्यार्थ्याला शिक्षकाने मदत केली पाहिजे, मार्गदर्शन केले पाहिजे. परंतु हा मार्गदर्शकच जर जीवनात गोंधळलेला असेल, त्याचे मन जर लहान असेल, संकुचित राष्ट्रवादाच्या कल्पना त्याने जर कवटाळलेल्या असतील, सिद्धान्तांच्या साच्यांनी त्याचे मन जर जखडलेले असेल;तर साहजिकच त्याचे विद्यार्थी हे त्याच्याच व्यक्तित्वाची प्रतिकृती ठरणार. यामुळे शिक्षणाला संघर्ष आणि वैचारिक गोंधळ यांचे उगमस्थान एवढाच अर्थ उरेल.

सुजाणपणे या गोष्टींचा विचार केला की खऱ्या शिक्षणाचा आरंभ शिक्षकापासूनच कसा होतो हे कळेल. मुलांच्या उद्याच्या सुरक्षिततेची काळजी वाहण्यापेक्षा आपल्या स्वत:च्या शिक्षणाचा सखोल विचार करणे अधिक महत्वाचे आहे.

अशा तऱ्हेचे आपल्या मनोविश्वाविषयीचे ज्ञान होणे शिक्षकाला आवश्यक असेल तरी ते अत्यंत कठीण आहे. कारण आपली मने आधीच ठरलेल्या वैचारिक साच्यात जखडली गेलेली असतात; एखाद्या धर्मपंथाची किंवा सिद्धान्ताची चाकोरी आपण आधीच स्वीकारलेली असते. यामुळेच मुलांना विचार कसा करावा हे शिकविण्याऐवजी विचार काय करावा हे आपण शिकवीत असतो.

सहसा आईबाप आणि शिक्षक आपल्याच द:खात आणि संघर्षात गुरफटलेले असतात. गरीब असो वा श्रीमंत असो सर्वत्र हेच आढळून येते. माणसाच्या सामाजिक आणि नैतिक अध: पतनाची खंत त्यांना कधी वाटत नाही, त्याविषयी निकडीने ते कधी चिंतन करीत नाहीत. त्यांच्यापुढे फक्त उद्दिष्टे असते - आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळून चांगल्या नोकऱ्या मिळाव्यात, त्यांचे दोनाचे चार हात होऊन त्यांनी सुखी, सुरक्षित रहावे.

आपल्या मुलांवर आपले प्रेम असल्याचे आईबाप नेहमी बोलत असतात, निदान असे मानले जाते. खरोखरीच आईबापांचे मुलांवर जर खरे प्रेम असते, तर माणसामाणसांत भेदांच्या भिंती उभ्या करणारा संकुचित राष्ट्रवाद आणि आपलीच कुटुंबे या कल्पनांवर त्यांनी भर दिला नसता. या संकुचित कल्पनांच्या आहारी गेल्यामुळे युद्ध आणि उपासमार या आपत्ती कोसळतात. आजच्या समाजात वकील व्हायचे असेल, डॉक्टर व्हायचे असेल तर त्या व्यवसायाचे खास शिक्षण घ्यावे लागते. परंतु आईबाप होणे म्हणजे एक फार मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी योग्य रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक ते शिक्षण मिळाले पाहिजे ही गोष्ट मात्र आपल्या कधीच ध्यानात येत नाही.

इतरांच्या सुखद:खाचा विचार न करता आपला स्वार्थ साधून कसा घ्यावा हे शिक्षण अगदी लहानपणापासून आपल्या कुटुंबातून आपल्याला मिळते. या व्यक्ती जेव्हा समाजात मिसळतात तेव्हा साहजिकच सामाजिक अधोगतीची बीजे त्या पेरीत जातात, व्यक्तिव्यक्तींचे संबंध जर प्रेमावर आणि समजूतदारपणावर आधारलेले असतील तरच भेदांचे निमूर्लन होईल. व्यक्तिव्यक्तींच्या अंत:करणात जर प्रेम असेल तर आपल्या मळ्याला स्वार्थाचे कुंपण पडणार नाही, मग कुटुंबाला तुरूंगाचे स्वरूप येणार नाही. अशा अवस्थेत केवळ आईबापांचे आपल्या मुलाबाळांशीच नव्हे तर शेजाऱ्यापाजाऱ्यांशीही समजूतदारपणाचे संबंध निर्माण होतील.

आईबाप आपल्याच समस्यांत इतके गुरफटून गेलेले असतात की, मुलांच्या विकासाची सारी जबाबदारी शिक्षकाच्या खांद्यावर टाकून मोकळे होतात. अशा वेळी केवळ विद्यार्थ्यांच्याच नव्हे, तर त्यांच्या आईबापांच्याही शिक्षणाला हातभार लावणे हे शिक्षकाचे कर्तव्य ठरते. अशा वेळी शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या आईबापांशी चर्चा करून त्यांना दाखवून दिले पाहिजे की, जगातल्या साऱ्या गोंधळाचे मूळ हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातल्या गोंधळात आहे. शिक्षकाने त्यांना स्पष्टपणे दाखवून दिले पाहिजे की, शास्त्राने कितीही भौतिक प्रगती केली तरी माणसाच्या जीवनमूल्यात त्यामुळे मूलभूत अशी क्रांती होऊ शकत नाही. शिक्षण म्हणजे बाह्य तंत्रे कितीही आपलीशी केली तरी आत्मस्वातंत्र्य आणि आत्मसमाधान यांचा लाभ त्यामुळे होणार नाही. म्हणूनच अशा तऱ्हेचे वातावरण स्वीकारण्यास विद्यार्थ्यास भाग पाडणे म्हणजे त्याचे व्यक्तित्व खुरटवून टाकण्यासारखे आहे.या सर्व गोष्टींची चर्चा आईबापाबरोबर शिक्षकाने करून त्यांना आपण कोणत्या मूल्यांवर आधारलेले नवशिक्षण देण्याची धडपड करीत आहोत ते दाखवून दिले पाहिजे. आपण शिक्षणशास्त्रातले तज्ञ आहोत असा अविर्भाव न बाळगता मुलांच्या मनाची घडण कशी आहे, त्यांच्या आवडी-निवडी कोणत्या आहेत यांची चर्चा आईबापांबरोबर करून शिक्षकाने त्यांचा आत्मविश्वास जागा केला पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकाने त्याचे व्यक्तित्व जाणून जर मनापासून रस घेतला, तर आईबापांना अशा शिक्षकाविषयी निश्चित विश्वास वाटू लागेल. अशा रीतीने शिकवीत असताना शिक्षक शिकत राहील. या तऱ्हेच्या परस्पर संबंधावरच खरे शिक्षण आधारलेले असते; धीरवृत्ती, समजूतदारपणा आणि प्रेम यांची चांगल्या शिक्षणात आवश्यकता असते. या गोष्टीचा साक्षात्कार झालेल्या सुसंस्कृत समाजातील काही शिक्षकांनी या शिक्षणविषयक नवे प्रयोग केलेले आहेत. लहान प्रमाणात शिक्षकांनी आणि पालकांनी सर्वत्र असे प्रयोग केले पाहिजेत.

*शिक्षण: जीवन रहस्य* प्र. ६

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

### कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

फाउंडेशनच्या इतर शाखा व कार्यशाळांविषयी माहितीसाठी वरील पत्त्यावर संपर्क साधावा.

### कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस् :

http://jkrishnamurti.org, www.kfionline.org, www.kfa.org, www.kfoundation.org, www.kinfonet.org

शाळा ही सवड असण्याची जागा आहे. जिथे शिकवणारा व शिकवला जाणारा हे दोघेही शिकत असतात. शाळेचे हे मध्यवर्ती सत्य आहे - 'शिकणे.' अवसर म्हणजे स्वत:साठी वेळ घेणे असे आमचे म्हणणे नाही, अर्थात त्याची देखील जरुरी आहे. एखादे पुस्तक घेऊन झाडाखाली किंवा खोलीत सहज वाचत बसणे असाही त्याचा अर्थ नव्हे; शांत मन:स्थितीत रहाणे असा देखील त्याचा अर्थ नव्हे; आणि आळशी होणे किंवा दिवास्वप्ने पाहण्यात वेळ घालवणे हे तर नव्हेच नव्हे. एखादी समस्या, करमणूक, इंद्रियसुख ह्यांनी सतत व्यापलेले नाही असे मन असणे, म्हणजे सवड (Leisure). आपल्या सभोवती काय घडते आहे आणि आपल्या अंतर्मनात काय घडते आहे हे ऐकायला आणि स्पष्टपणे बघायला मनाकडे अनंत काल आहे हे सवडीमध्ये सूचित होते. फुरसतीचा रोख स्वातंत्र्याकडे असतो, ज्याचा अर्थ इच्छेप्रमाणे वागणे असा केला जातो, माणूस असेही ते करतच असतो, आणि त्याच्यामुळे भयंकर दु:ख, लुच्चेगिरी व गोंधळ माजतो. मुक्त वेळ म्हणजे हेतुविरहित, दिशाविरहित शांत मन असणे. ह्या मुक्तकालावधीच्या अवस्थेतच मन शिकू शकते. फक्त विज्ञान, इतिहास, गणितच नव्हे तर स्वत:विषयी पण शिकू शकते, आणि परस्परसंबंधातून देखील स्वत:विषयी शिकू शकते.

*द होल मुव्हमेंट ऑफ लाइफ इज लर्निंग - जे. कृष्णमूर्तींची त्यांच्या शाळांना पत्रे प्र. ३ - फुरसत (leisure)*

### कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र

हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, व्हिडीडीज् उपलब्ध आहेत. बाल आनंद हे बालविकास केंद्रही मुंबई केंद्राशी संबद्ध आहे.

केंद्रातर्फे वेळोवेळी कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या अनुषंगाने जीवनाचा सखोल अभ्यास करणाऱ्या विचारवंतांची भाषणे आयोजित करण्यात येतात. दर शनिवारी, रविवारी कृष्णजींची भाषणे व संवादांचे व्हिडिओ येथे दाखविले जातात. तसेच दर गुरूवारी संवाद गटाचे आयोजन होते.

सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी व्हिडिओ आणि त्यानंतर येणाऱ्या सोमवारी त्यावर संवाद आयोजित केले जातात. मुंबईतील इतर महाविद्यालये आणि शाळांमधून विद्यार्थी आणि शिक्षकांबरोबर संवाद साधण्यातही संस्था कार्यरत आहे.

**संपर्क :-** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाते. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.


**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**
**FORM IV**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of publication | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 2. | Periodicity of publication | : | Once in four months, (Januuary, May, September) |
| 3. | Printer's Name | : | Anand Limaye |
| | Whether citizen of India | : | Yes |
| | Address | : | India Printing Works, 42, G.D.Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400031. |
| 4. | Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| | Whether citizen of India | : | Yes |
| | Address | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 5. | Editor's Name | : | Vasanti Padte |
| | Address | : | Krishnamurti Foundation India, Foundation Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 6. | Name and address of Individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowledge and belief

Sd
( P.V. Dabholkar)



*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*


*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com


*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net ● Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*